अपर पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई
सर पोचखानवाला रोड, वरळी, मुंबई–३०
दुरध्वनी क्र.– ०२२–२४९२१२१२, २४९२२६१८
Email - addlcpacbmumbai@mahapolice.gov.in

दिनांक :– ०५/०२/२०२५

## –: प्रेसनोट :–

| | |
|---|---|
| ला.प्र.वि. | मुंबई विभाग |
| गुन्हा नोंद क्रमांक | ०६/२०२५ |
| कलम | कलम ७, ७(अ), १२ भ.प्र.अधिनियम १९८८. |
| आरोपी लोकसेवक | १) दिनेश श्रीधर श्रेष्ठ, कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र गृहनिर्माण क्षेत्रविकास प्राधिकरण, कलानगर, बांद्रा पुर्व, मुंबई<br>२) संजय मणीलाल त्रिवेदी, कॉन्ट्रक्टर (खाजगी इसम)<br>३) राजकुमार हिरलाल यादव, रिक्षा चालक (खाजगी इसम) |
| लाचेची मागणी | रू. ६,६०,०००/- |
| स्विकारलेली रक्कम | रु. ६०,०००/- |
| थोडक्यात माहिती | तक्रारदार यांचे काकांनी त्यांची झोपडी बक्षीसपत्राद्वारे तक्रारदार यांचे नावावर केली होते. सदरहु झोपडी ही झोपडपट्टी पुर्नवसन अंतर्गत प्रस्तावित होती. तक्रारदार यांनी भुव्यवस्थापक मुंबई मंडळ, बोरीवली विभाग, बांद्रा, मुंबई कार्यालयात अभय योजने अंतर्गत परिशिष्ट २ मध्ये हस्तांतर करण्याबाबत अर्ज सादर केला होता. नमूद कार्यालयात इतर १० झोपडपट्टी धारकांनीदेखील अर्ज सादर केलेले होते. तक्रारदार हे दिनांक २७/०१/२०२५ रोजी त्यांचे व इतर झोपडपट्टी धारकांचे प्रलंबीत कामाचा पाठपुरावा करण्याकरीता नमूद कार्यालयात गेले असता, तेथील लोकसेवक श्री. दिनेश श्रीधर श्रेष्ठ, कार्यकारी अभियंता यांनी प्रलंबीत कामाकरीता प्रत्येकी रू. ६०,०००/- प्रमाणे एकूण रू. ६,६०,०००/- इतक्या लाचेची मागणी करून खाजगी कॉन्ट्रक्टर श्री. संजय त्रिवेदी यांच्याकडे रू. २,००,०००/- इतकी लाचेची रक्कम ॲडव्हान्स म्हणून जमा करण्यास सांगितली. परंतू तक्रारदार यांना लोकसेवकास लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी दिनांक ०४/०२/२०२५ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग येथे समक्ष येवून तक्रार दिली.<br>नमूद तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक ०४/०२/२०२५ रोजी करण्यात आलेल्या पडताळणी कारवाई दरम्यान लोकसेवक यांनी तक्रारदार यांच्याकडे त्यांचे व इतर झोपडीधारक यांचे कामाकरीता रू. ६,६०,०००/- लाचेची मागणी करून त्यांच्या कामाचे रू. ६०,०००/- इतकी लाचेची रक्कम खाजगी कॉन्ट्रक्टर संजय त्रिवेदी यांच्याकडे देण्यास सांगितल्याचे निष्पन्न झाले. त्याप्रमाणे दिनांक ०५/०२/२०२५ रोजी करण्यात आलेल्या सापळा कारवाई दरम्यान खाजगी कॉन्ट्रक्टर संजय त्रिवेदी यांनी रू. ६०,०००/- लाचेची रक्कम स्विकारून रिक्षा चालक राजकुमार यादव यांचेकडे दिली असता, आरोपी क्र. २ व ३ यांना लाचेची रक्कम स्विकारताना रंगेहाथ पकडण्यात आले. म्हणून उपरोक्त नमूद लोकसेवक व इतर खाजगी इसम यांच्याविरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ कलम ७, ७(अ), १२ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. |

तपास अधिकारी :- श्रीमती सुनिता दिघे, पोलीस निरीक्षक पर्यवेक्षक अधिकारी :- श्री. शिरीष माणगांवे, सहाय्यक पोलीस आयुक्त
मार्गदर्शन अधिकारी :- श्री. संदीप दिवाण, अपर पोलीस आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई
श्री. अनिल तुकाराम घेरडीकर, अपर पोलीस उप आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई
श्री. गजेंद्र गणपत मांगळे, अपर पोलीस उप आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

( मनिषा झेंडे )
सहाय्यक पोलीस आयुक्त,(प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई बृहन्मुंबई विभागा तर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभागाशी संपर्क साधावा.

**संपर्क :- लाचलुचपत प्रतिबंधकविभाग, बृहन्मुंबई विभाग, ९१, सरपोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई.**
**टोलफ्री** क्र. १०६४, दुरध्वनी क्र. ०२२-२४९२१२१२, फॅक्स क्र. ०२२-२४९२२६१८
**वेबसाईट** :– acbmaharashtra.gov.in, **ईमेल** :– acbwebmail@mahapolice.gov.in
**ईमेल** :– addlcpacbmumbai@mahapolice.gov.in
**फेसबुक** :– www.facebook.com - Maharashtra ACB **मोबाईल ॲप** :– www.acbmaharashtra.net